# कला व विज्ञान महाविद्यालय, नाचणगाव-पुलगाव

## मराठी विभाग

## आपले सहर्ष स्वागत करीत आहे

प्रा. काशीनाथ तरासे

# पद्य विभाग बी. ए. १

# १. ज्ञानदेवांचे अभंग

## अभंग (१)

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।।१।।

हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा । पुण्याची गणना कोण करी ।।२।।

असोनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्री उभारी बाह्या सदा ।।३।।

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणे । द्वारकेचे राणे पांडवा घरी ।।४।

## अभंग (२)

तीर्थ व्रत नेम भावेविण सिध्दि । वायाचि उपाधि करिसी जना ।।१।।

भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे । करतळी आंवळे तैसा हरी ।।२।।

परियाचा रवा घेता भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसे ।।३।।

ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हाती ।।४।।

# अभंग (३)

* अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ।।१।।
* नित्य पाठ करी इंद्रायणी तीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ।।२।।
* असावे स्वस्थ चित्त एकाग्री मन । उल्हासें करून स्मरण जीवीं ।।३।।
* अंतकाळी तैसा संकटाचे वेळी । हरि तया सांभाळी अंतर्बाह्य ।।४।।
* संत सज्जनांनी घेतली प्रचीती । आळसी मदमती कोंवि तरे ।।५।।
* श्रीगुरू निवृत्ति वचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ।।६।।

# २. हंस–नल संवाद

## रघुनाथ पंडित (सतरावे शतक)

### दिंडी

न सोडी हा नळ भूमिपाळ मातें ।
असे जाणोनि हंस वदे यातें ।।
हंसहिंसका धन्य तुझ्या हातें ।
स्वस्थहातें पावेंन पक्षपातें ।।१।।
पदापदीं आहेत वीर कोटी ।
भले जुंझारं शक्ती जयां मोठी ।।
तया माराया धैर्य धरीं पोटीं ।
पांखिरूं मारणें हे मारणें बुद्धि खोंटी ।।२।।
वधुनि माझी ही कनकरूपी काया ।
कटकमुकुटादी भूषणें कराया ।।
क्शी आशा तुज उद्भवली राया ।
थोर औदार्य थोर दयामाया ! ।।३।।

### पद

हरहर सापडलों, । कैसा फांसां पडलों ।।धृ.।।
इतर नदी जलटाकीं । टाकुनि आलों याच तटाकीं ।।
सोडुनि मानसकेली । कापुनि घ्याया आलों शेली ।।
ठेविन तव पदिं माथा । आतां सोडविं गा रघुनाथा ।।५।।